**महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,**

**कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर**

**राज्यशास्त्र विभाग**

# वैज्ञानिक दृष्टिकोण

**बुधवार, दि. 3 मार्च 2025**

आज दि. 3 मार्च २०२५ रोजी राज्यशास्त्र विभागाच्या वतीने 'वैज्ञानिक दृष्टिकोण' या विषयावर व्याख्यानचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक कॉलेजमधील इंग्रजी विभागाचे प्रा. डॉ. राजेश दांडगे हे होते. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. अंगद पाटील यांनी केले. प्रस्तुत विषयासंबंधी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. राजेश दांडगे यांनी वैज्ञानिक दृष्टिकोण म्हणजे काय? याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्वामध्ये घटनाकारांनी वैज्ञानिक दृष्टिकोण स्वीकारला आहे. भारत हा एक परंपरावादी देश असून तो अनेक प्रकारच्या अनिष्ट रूढी, प्रथा आणि परंपरा यांनी ग्रस्त आहे. त्यामुळे या देशाचा विकास होण्यात अडथळे उत्पन्न झालेले आहेत. प्राचीन तसेच मध्ययुगीन काळात अनेक तत्वज्ञ आणि समाज धुरीण यांनी समाजाला वैज्ञानिक दृष्टिकोणाचा स्विकार करण्यास आपल्या विचार व कार्यातून प्रवृत्त केले. पण काही कालांतराने समाज पुन्हा अंधश्रद्धांच्या विळख्यात अडकला गेला. त्यामुळे समाजाचा शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक विकास होऊ शकला नाही. आधुनिक काळात ब्रिटिश भारतात आल्यानंतर राजाराम मोहन रॉय यांनी सामाजिक सुधारणांची बाजू घेऊन चुकीच्या गोष्टींना विरोध केला. महाराष्ट्रातही म. फुले, आगरकर, न्या. रानडे, राजर्षि शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हा दृष्टिकोण विकसित केला. स्वातंत्र्य मिळल्यानंतरही अनेक राज्यामध्ये याचा प्रचार व प्रसार करण्याचा प्रयत्न केला जात आहे, याविषयी त्यांनी विस्ताराने मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. संतोष खडसे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात वैज्ञानिक दृष्टिकोण अंगीकारण्याचे महत्व अधोरेखित केले. या कार्यक्रमाचे आभार प्रा. रविराज सूर्यगंध यांनी व्यक्त केले.

HEAD
Department of Political Science
Karmaveer Bhaurao Patil College
Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli (M.S.)

PRINCIPAL
Karmaveer Bhaurao Patil College
Urun-Islampur, Dist. Sangli. 415 409




वैज्ञानिक दृष्टिकोण या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. राजेश दांडगे




वैज्ञानिक दृष्टिकोण या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. राजेश दांडगे, समोर उपस्थित विद्यार्थी




अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. के. खडसे




उपस्थित विद्यार्थी